# महाराष्ट्र न्युज नेटवर्क

Pune Vol. 3, Issue - 8 (Monday) 25 August to 31 August 2025 (Weekly) Price Rs. 1/- Pages - 4

पुणे वर्ष ३ रे, अंक ८ वा (सोमवार) २५ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२५ (साप्ताहिक) किंमत १ रुपये पाने ४

संपादक : अभिजीत डुंगरवाल
मो : 9923133815


# सूर्यदत्त फिजिओथेरपी इन्स्टिट्यूटचा आयआयआरएफ रँकिंगमध्ये मानाचा मुकुट

## देशात 27 वा तर महाराष्ट्रात सहावा क्रमांक




**महाराष्ट्र न्युज नेटवर्क**

**पुणे : सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपीने २०२५ या वर्षासाठी जाहीर झालेल्या प्रतिष्ठित इंडियन इन्स्टिट्युशनल रँकिंग फ्रेमवर्कमध्ये (आयआयआरएफ) राष्ट्रीय स्तरावर २७ वा, महाराष्ट्रात सहावा आणि पश्चिम विभागात आठवा क्रमांक पटकावला आहे. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया व उपाध्यक्षा सुषमा संजय चोरडिया यांनी प्राचार्य डॉ. सिमी रेठरेकर, सर्व विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले.**



प्रा. डॉ. संजय चोरडिया
संस्थापक अध्यक्ष, सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन

**"विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक आरोग्याकडे विशेष लक्ष दिले जाते. त्यासाठी विविध उपक्रम, जसे नऊ तासांचा सायलेंट रीडाथॉन, नियमित योग व झुंबा सेशन्स, मेंटर-मेंटी प्रोग्राम, मानसशास्त्रीय समुपदेशन, तसेच क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांचा समावेश आहे. 'आयआयआरएफ'ची ही मान्यता जागतिक दर्जाचे आरोग्यशिक्षण देण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. शैक्षणिक उत्कृष्टतेसह प्रत्यक्ष क्लिनिकल अनुभव व सर्वांगीण शिक्षणाचा संगम यामुळे आमचे विद्यार्थी केवळ कुशल व्यावसायिकच नव्हे, तर करुणाशील व समाजाभिमुख नागरिक घडतील, असा विश्वास वाटतो."**



सुषमा चोरडिया
उपाध्यक्षा व सचिव, सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन

**"सर्वांगीण विकासाचे गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर 'सूर्यदत्त'ने कायमच भर दिला आहे. अभ्यासक्रम, क्लिनिकल प्रशिक्षण, मूल्याधिष्ठित शिक्षण, सांस्कृतिक जाण व आरोग्यसाधना यांचा समन्वय साधला जातो. ही राष्ट्रीय मान्यता प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमांचे फलित आहे. आधुनिक पायाभूत सुविधा, अनुभवी प्राध्यापकवर्ग व सशक्त इंडस्ट्री सहयोग यांच्या बळावर 'सूर्यदत्त' भावी आरोग्य नेते घडवत आहे. समाजात मूल्य, सहानुभूती व सामाजिक जबाबदारी जोपासणारे सक्षम आरोग्यव्यावसायिक घडविण्यास वचनबद्ध आहे."**

देशभरात प्रतिष्ठा, पारदर्शकता आणि कॉर्पोरेट मान्यतेसाठी ओळखली जाणारी 'आयआयआरएफ'ची क्रमवारी ही तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्फत विश्लेषण करून अधिकृत व वैविध्यपूर्ण अशा पद्धतीने जाहीर होते, जी उद्योग जगताकडूनही स्वीकारली जाते. रोजगार, अध्यापन-अध्ययन व स्रोत, संशोधन, औद्योगिक उत्पन्न व एकीकरण, प्लेसमेंट धोरण व सहकार्य, भविष्यवेधी मार्गदर्शन आणि बाह्यधारणा व आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन या सात निकषांवर सर्वेक्षण करून ही क्रमवारी तयार केली जाते. सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स ही आरोग्य व संबंधित क्षेत्रातील नामवंत शिक्षणसंस्था आहे.

सूर्यदत्त कॉलेज ऑफ फिजिओथेरपीतर्फे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्नित बॅचलर ऑफ फिजिओथेरपी हा पूर्णवेळ, तर महाराष्ट्र स्टेट बोर्ड व्होकेशनल एज्युकेशन एक्झाम (एमएसबीव्हीईई) संलग्नित फिजिओथेरपी पदविका, नॅचरोथेरपी पदविका, नर्सिंग केअर प्रमाणपत्र अभ्यासक्रम, डेंटल असिस्टंट, ऑप्थाल्मिक टेक्निशियन हे अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जातात. संवादात्मक, प्रात्यक्षिक, सहकार्यभावना व संकल्पनाधारित अशा अभिनव पद्धतींनी येथे अध्यापन केले जाते. योग, ध्यान, व्यक्तिमत्व विकास, सॉफ्ट स्किल्स, परदेशी भाषा, इनोव्हेशन व इन्क्युबेशन, कॉग्निटिव्ह लर्निंग अशा मूल्याधिष्ठित उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो. समाजाला उपयुक्त असे मनुष्यबळ विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांना तज्ज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन उपलब्ध केले जाते.

सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेसने शाश्वत, कृष्णा, रांका, देवयानी, सुभोध, औंध इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, नित्यानंद इन्स्टिट्यूट अशा नामांकित मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल्सशी करार केले आहेत. या माध्यमातून विद्यार्थ्यांना दररोज रुग्णांसोबत प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळते. मस्क्युलोस्केलेटल, न्यूरोलॉजिकल, पेडियाट्रिक व कार्डिओ-पल्मोनरी फिजिओथेरपी अशा विविध शाखांमध्ये तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण दिले जाते. याशिवाय, पानशेत येथील जनसेवा फाउंडेशनमार्फत ग्रामीण व ज्येष्ठ नागरिक आरोग्यसेवेत योगदान, अभय प्रभवना व फिरोदिया इन्स्टिट्यूट ऑफ फिलॉसॉफी अँड कल्चरद्वारे सांस्कृतिक व नैतिक शिक्षण, आर्टिफिशियल लिम्ब सेंटर पुणे येथे प्रगत कृत्रिम अवयव पुनर्वसन व मुंबईतील ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ फिजिकल मेडिसिन अँड रिहॅबिलिटेशन येथे आंतरशाखीय प्रशिक्षण मिळते. ऑस्टिओपॅथी, नेचरोपॅथी, न्यूट्रिशन, ॲक्युपंक्चर व ॲक्युप्रेशर यांसारख्या कार्यशाळाही आयोजित केल्या जातात.

# विद्यापीठ चौक उड्डाणपुलावरील प्रत्यक्ष स्थळपाहणी



**महाराष्ट्र न्युज नेटवर्क**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता योगेश कुलकर्णी यांनी मेट्रो सवलतकार कंपनी पुणे आय.टी. सिटी मेट्रो रेल लि., उड्डाणपूल कंत्राटदार टाटा प्रोजेक्ट्स लि. व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या प्रतिनिधींसोबत औंध ते शिवाजीनगर मार्गावरील उड्डाणपुलाची स्थळपाहणी करून मुख्य अभियंता रिनाज पठाण यांच्या निर्देशानुसार कामाबाबत आवश्यक सूचना दिल्या.**

> उद्घाटनावेळी लावलेली तात्पुरती होर्डिंग्ज काढण्यात आलेली आहेत.

> औंध रस्ता व विद्यापीठ चौक येथील उड्डाणपूलाची उंची किमान ५.५० मी. राखून २१० मीटर रॅम्पचे काम तांत्रिक मान्यतेनंतर पूर्ण.

> दिशा दर्शक फलक बसविणे, समतलातील उंचवटा दुरुस्त करणे, खडी/कचरा साफ करणे यासंबंधी कंत्राटदारास सूचना.

> डांबरीकरण जून-जुलै महिन्यात पूर्ण केले असून, सद्यस्थितीत वाहतूक सुरु आहे व नैसर्गिक प्रक्रियेतून रस्ता अधिक मजबूत होईल.

> सध्या औंध-शिवाजीनगर मार्गावरील वाहतूक सुरु असून, बाणेर व पाषाण बाजूकडील बांधकाम प्रगतीपथावर आहे.

> पुणेकरांच्या सोयीसाठी उड्डाणपूल बांधकामाची कामे नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याचे प्रयत्न प्राधिकरणामार्फत सातत्याने सुरू आहेत.

# जिल्हा माहिती अधिकारी पदी युवराज पाटील रुजू



**महाराष्ट्र न्युज नेटवर्क**

**पुणे : पुणे जिल्ह्याचे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून युवराज पाटील यांनी हा पदभार स्वीकारला. यावेळी माहिती अधिकारी सचिन गाढवे यांनी त्यांचे स्वागत केले.**

युवराज पाटील यांनी यापूर्वी सहायक संचालक मंत्रालय, सहायक संचालक विभागीय माहिती कार्यालय, पुणे तर अकोला, वाशिम, सातारा, लातूर आणि जळगाव येथे जिल्हा माहिती अधिकारी या पदावर काम केले आहे.

जिल्हा माहिती कार्यालयामार्फत शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना, उपक्रम आणि विकासकामांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणारे महत्वाचा दुवा मानला जातो. शासनाची ध्येयधोरणे आणि जनहिताचे कार्यक्रम प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील राहीन, असेही पाटील म्हणाले.

यावेळी जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

# संपादकीय


अभिजित डुंगरवाल

## बेरोजगारी आवडे सरकारला...

**नवोदित नोंदींची वाढ आणि वास्तविकता** – गेल्या जानेवारीपर्यंत राज्यात नोकरी, कौशल्यविकास वा व्यवसायासाठी नोंदणी करणाऱ्या बेरोजगारांची संख्या ७१ लाखांपर्यंत पोहोचली. याउलट, २०२४ साली ही नोंदणी फक्त १० लाख २१ हजार इतकी होती- म्हणजे एक वर्षामध्ये सातपट वाढ झाली. मात्र, २०२४ मध्ये नोंदणीकृत तरुणांपैकी फक्त २ लाख २७ हजारांना रोजगाराची संधी मिळाली.

**आश्वासने आणि फलेरीची गरज** – सरकारने कितीतरी नोकरी संधी सुनिश्चित केल्या आहेत, तरी त्या प्रत्यक्षात पूर्णपणे अमलात येत नाहीत. पोलीस भरती वगळता या घोषणांमध्ये सातत्य दिसत नाही. तरुणाई रस्त्यावर उतरतेय - ते काय करणार?

**कंत्राटीकरणाचा विस्तार** – शिक्षण, आरोग्यसेवा, सरकारी अभियान यांच्या अंमलबजावणीत कंत्राटी पद्धतीचे स्वरूप वाढले आहे. शिक्षण क्षेत्रात अल्पवेतनावर अभ्यासक व प्राध्यापक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, अंगणवाडी सहाय्यिका इ. या सगळ्या कंत्राटी कामगारांवर अवलंबून आहे. जरी काही प्रमाणात वेतन वाढले असले तरी त्यांची अस्थिरता कायम आहे.

**उद्योगातील पद्धतीची चिंतनीय बाजू**– 'रोजगार हमी' योजना अंतर्गत लोकांना कामाची हमी देण्याच्या नावाखाली कंत्राटी कंपनींना भरतीचा मार्ग खुले झाला आहे; यात सरकारचा सहभाग इतर मार्गे स्पष्ट होत नाही. या पद्धतीमुळे सरकार आणि कंपन्या दोघांसाठी मिळकताचे नवे मार्ग निर्माण झाले आहेत.

राज्यातील बेरोजगारीचे स्वरूप गंभीर आहे आणि त्या विरोधात सरकारने घेतलेल्या उपाययोजनांमध्ये जिंकाजनाची तगबाजी, पण प्रत्यक्षात ढासळलेले अमल याचा तिखट वास्तव उघडतो. कंत्राटी रोजगाराचा वाढता विस्तार ही चिंता वाढवणारी बाब आहे.

# नद्या प्रदूषणमुक्त करण्यासाठी समन्वयाचे प्रयत्न सुरू

### उपनद्या-नाल्यांवरही शास्त्रोक्त प्रक्रिया आवश्यक : राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ



महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : पुणे जिल्ह्यातील प्रमुख नद्या प्रदूषणमुक्त करण्यासाठी सुरू असलेल्या प्रकल्पांना गती मिळाली असून, केवळ मोठ्या नद्यांवर नव्हे तर त्यात मिळणाऱ्या छोट्या उपनद्या व नाल्यांच्या पाण्यावरही शास्त्रोक्त प्रक्रिया होणे अत्यावश्यक आहे. यासाठी पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पीएमआरडीए व जिल्हा परिषद यांच्या संयुक्त बैठकीचे आयोजन लवकरच करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.**

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार श्रीरंग बारणे, आमदार बापूसाहेब पठारे, आमदार बाबाजी काळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखरसिंह, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

राज्यमंत्री मोहोळ म्हणाले की, ग्रामीण व शहरी भागातील गटार व औद्योगिक सांडपाणी थेट नद्यांमध्ये मिसळल्याने जलप्रदूषण गंभीर होत आहे. यावर नियंत्रण आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून प्रकल्प उभारले जात आहेत. मात्र, उपनद्या व नाल्यांवरही प्रभावी प्रक्रिया होणे गरजेचे असून सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व प्राधिकरणांनी यासाठी समन्वय साधावा. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जिल्हा परिषदेकडून १० नवे कचरा प्रक्रिया प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. यामुळे कचरा व्यवस्थापन, मलनिस्सारण व स्वच्छता उपक्रमांना चालना मिळून पर्यावरण संतुलनास मदत होईल.

बैठकीत इतर महत्त्वाचे विषयही चर्चिले गेले. जुलैमध्ये पुणे मेट्रोने १.९२ लाख प्रवासी वाहून नेले असून ऑगस्टमध्ये हा आकडा २.१३ लाखांवर पोहोचल्याचे नोंदविण्यात आले. मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला गती देण्याचे निर्देश मंत्री मोहोळ यांनी दिले. तसेच, पुणे विमानतळाच्या जुन्या टर्मिनलचे नूतनीकरण डिसेंबरपर्यंत पूर्ण होणार असून नव्या टर्मिनलसाठी जागा अधिग्रहणाचे काम सुरू असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. बैठकीत जिल्ह्यातील रस्ते विकास, पाणीपुरवठा, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय व कल्याण विभागाच्या योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीत गती आणण्यासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासन यांच्यातील समन्वय वाढविण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.




'महाराष्ट्र न्युज नेटवर्क' RNI NO. MAHMAR/2023/88387 हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अभिजित ताराचंद डुंगरवाल यांनी कल्याणी कार्पोरेशन, १४६४, सदाशिव पेठ, पुणे -४११०३० येथे छापून ऑफिस नं. ३०१ तुलसी अपार्टमेंट, महावीर पार्क जवळ, स्वामी समर्थ नगर, काकडे वस्ती, कोंढवा बु., पुणे -४११०४८. येथे प्रसिद्ध केले. प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

"Maharashtra News Network" RNI NO. MAHMAR/2023/88387 Weekly Publication is Owner, Publisher, Editor Abhijit Tarachand Dungarwal, Printed at Kalyani Corporation, 1464, Sadashiv Peth, Pune : 411 030 and Published at Office No. 301, Tulsi Apts., Near Mahavir Park, Swami Samarth Nagar, Kakde Wasti, Kondhwa BK., Pune - 411 048. Editor, Printer & Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Pune court Mo. : 9923133815

# फ्रेशर्स पार्टी आयोजकांना पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांचा इशारा

## इव्हेंट कंपन्यांसह हॉटेल, पबचे परवाने रद्द करण्याची व गुन्हा दाखल करण्याची कारवाई होणार

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : महाविद्यालयीन तरुण–तरुणींसाठी फ्रेशर्स पार्टीच्या नावाखाली दारूच्या पाट्या वाहणाऱ्या पार्ट्या आयोजित करणाऱ्या इव्हेंट कंपन्यांसह हॉटेल व पबचालकांना पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी कडक इशारा दिला आहे. असा प्रकार आढळल्यास त्यांचा परवाना रद्द केला जाईल तसेच गुन्हा दाखल करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.**



काही दिवसांपूर्वी मुंढव्यातील पी यो गार्डन पबमध्ये एमआयटी कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी बेकायदा फ्रेशर्स पार्टी आयोजित केली होती. या पार्टीत उत्पादन शुल्क विभागाची कोणतीही परवानगी न घेता मद्य पुरवले जात होते. त्यावेळी दारू प्यायलेल्या तरुण–तरुणींनी परिसरात गोंधळ घालून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केला होता. त्यामुळे उत्पादन शुल्क विभागाने ही पार्टी बंद पाडली होती.

याप्रकरणी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी एक पत्रक प्रसिद्ध केले आहे. काही बार, पबमध्ये उत्पादन शुल्क नियमांचे उल्लंघन करून अल्पवयीन मुलांना मद्यपान दिले जात आहे तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी फ्रेशर्स पार्ट्यांचे आयोजन केले जात आहे, जे नियमबाह्य आहे.

हॉटेल व पबचालकांनी प्रवेश देण्यापूर्वी डिजी लॉकर कागदपत्रांद्वारे ग्राहकांचे वय तपासणे बंधनकारक करण्यात यावे, असे निर्देश त्यांनी दिले आहेत. तसेच, विद्यार्थ्यांना अशा बेकायदा कार्यक्रमात सहभागी होण्यापासून परावृत्त करण्यासाठी महाविद्यालयांनी त्यांना सतर्क करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. जर कोणत्याही इव्हेंट कंपनीने अशा प्रकारचा कार्यक्रम आयोजित केला, तर त्यांच्यावरही फौजदारी कारवाई केली जाईल, असे आदेश पोलीस आयुक्तांनी दिले आहेत.

### फ्रेशर्स पार्टी आयोजित करणाऱ्या 'किकी पब'वर गुन्हा दाखल

**महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी फ्रेशर्स पार्टी आयोजित केल्याप्रकरणी पुणे पोलिसांनी बंडगार्डन येथील राजाबहादूर मिलमधील किकी पबवर गुन्हा दाखल केला आहे.**

याबाबत पोलीस अंमलदार अमित बधे यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून पोलिसांनी निखिल प्रकाश सुर्वे (४२, रा. बोरीवली ईस्ट, मुंबई), रोहन रमेश सावंत (३९, रा. खराडी), उपेंद्र संजय जुवेकर (२६, रा. सोमवार पेठ), सुदर्शन फटाके (२२, रा. पुणे) यांच्यावर गुन्हा नोंदवला आहे. ही पार्टी २३ ऑगस्ट रोजी आयोजित केली होती.

पोलिसांच्या माहितीनुसार, आयोजकांनी कोणतीही परवानगी न घेता विना परवाना फ्रेशर्स पार्टी आयोजित केली होती. या पार्टीसाठी १०० ते १५० विद्यार्थ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. पोलिसांनी पूर्वसूचना देऊनही आयोजकांनी कोणतीही माहिती किंवा परवानगी न घेता हा कार्यक्रम आयोजित केला.

मनसेला याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाला कळवले. त्यानंतर विभागाचे अधिकारी व मनसे पदाधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# वेटरने चाकूने वार करून हॉटेल मालकाचा खून

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : "दारू पिऊन कामावर येऊ नको," असे सांगितल्याच्या रागातून वेटरने चाकूने वार करून हॉटेल मालकाचा खून केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना एनडीए रस्त्यावरील पिकॉक गार्डन अँन्ड रेस्टॉरंटमध्ये बुधवारी रात्री घडली.**



संतोष सुंदर शेट्टी (वय ४५) असे खून झालेल्या हॉटेल मालकाचे नाव आहे. उत्तमनगर पोलिसांनी रेस्टॉरंटच्या भटारखान्यातील कामगार उमेश दिलीप गिरी (वय ३९, रा. पिकॉक गार्डन स्टाफ क्वार्टर्स) याला अटक केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष शेट्टी यांच्या हॉटेलमध्ये उमेश गिरी हा २२ दिवसांपासून कामाला होता. तो तेथील कामगारांच्या क्वार्टर्समध्ये राहत होता. तो दारू पिऊन कामावर आल्याने संतोष शेट्टी यांनी त्याला, "तू दारू पिऊन कामावर येऊ नको. दारू प्यायची असेल तर कामावर यायचे नाही," असे सांगितले. त्यावरून त्यांच्यात वाद झाला होता.

गिरी याने, "माझा पगार द्या, मी येत नाही," असे सांगितले. त्यावर शेट्टी यांनी, "तुला कामाला लागून २२ दिवस झाले. त्यात तू अडीच हजार रुपये अगोदरच घेतले आहेत. मग पगार कोठून देऊ?" असे उत्तर दिले. त्यामुळे गिरी रागावला.

बुधवारी रात्री शेट्टी हे भटारखान्यात आले असता, गिरीने तेथील मोठा चाकू घेऊन त्यांच्या मानेवर सपासप वार केले. त्यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले; परंतु त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून गिरी याला अटक केली आहे.

# सराईत वाहन चोरट्याला केले जेरबंद

## मार्केटयार्ड पोलिसांनी 1 लाख 60 हजारांच्या 5 मोटारसायकली केल्या जप्त

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : गणेशोत्सवाच्या अनुषंगाने तपासणी करत असताना संशयित मोटारसायकल चालकाला ताब्यात घेऊन चौकशी केल्यावर त्याच्याकडील गाडी चोरीची असल्याचे आढळले. अधिक तपासात मार्केटयार्ड पोलिसांनी या वाहनचोरट्याकडून १ लाख ६० हजार रुपयांच्या ५ मोटारसायकली जप्त केल्या आहेत.**



अनिल गणेश बिरादार (वय २५, रा. महादेव कॉलनी, क्रिकेट मैदानाजवळ, लोहगाव) असे या सराईत वाहन चोरट्याचे नाव आहे.

मार्केटयार्ड पोलीस ठाण्याचे तपास पथक गणेशोत्सवाच्या अनुषंगाने रेकॉर्डवरील गुन्हेगारांची तपासणी करत होते. त्यावेळी पोलीस अंमलदार दत्तात्रय राऊत यांना एक जण मोटारसायकल घेऊन जात असल्याचे दिसले. पोलीस उपनिरीक्षक भापकर यांनी संशयास्पदरीत्या गाडी घेऊन जाणाऱ्याला गाडीबाबत विचारपूस केली. त्यावेळी तो तेथून पळून जाण्याचा प्रयत्न करत होता. पोलिसांनी त्याला पकडून चौकशी केली. त्याच्याकडील गाडी त्याने मार्केटयार्ड गेट नं. १ येथील पार्किंगमधून चोरी केल्याचे सांगितले. पोलिसांनी तपास केल्यावर त्या मोटारसायकलीबाबत मार्केटयार्ड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी त्याला अटक केली. अधिक तपासात त्याने मार्केटयार्ड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आणखी ३ गाड्या चोरल्याची कबुली दिली.

ही कारवाई अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त धन्यकुमार गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनिषा पाटील यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक सुनिल भापकर, पोलीस अंमलदार दत्ता राऊत, राजेश थोरात, कौस्तुभ जाधव, महेश जेधे, किरण जाधव, नितीन झेंडे व आशिष यादव यांनी केली आहे.

# पोलीस असल्याचे भासवून कामगाराला लुबाडले



संग्रहित चित्र

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : पोलीस असल्याचे भासवून एका पुरुष आणि एका महिलेने लॉजमधील कामगाराला धमकावून ६ हजार रुपये उकळल्याची घटना उघडकीस आली आहे. सहकारनगर पोलिसांनी या दोघांविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.**

या प्रकरणात मथीलेशकुमार विष्णुदेव पाल (वय १९, रा. ईशा लॉज, धनकवडी, मूळ रा. मधुबनी, बिहार) यांनी फिर्याद दिली आहे. ही घटना २७ ऑगस्ट रोजी सकाळी सव्वापाच ते साडेसहा वाजण्याच्या सुमारास सातारा रोडवरील शंकर महाराज मठासमोरील ईशा लॉज येथे घडली.

फिर्यादी पाल हे लॉजमध्ये काम करतात. पहाटे सव्वा पाचच्या सुमारास एक पुरुष आणि एक महिला तेथे आले. त्यांनी पोलीस असल्याची बतावणी करत पाल यांना "तुला चौकशीसाठी पोलीस ठाण्यात न्यायचे आहे" असे सांगून जबरदस्तीने आपल्या स्वीफ्ट कारमध्ये बसवले.

यानंतर त्यांनी स्वारगेटच्या दिशेने गाडी नेली व पाल यांच्या मोबाईलमधून ऑनलाईन ६ हजार रुपये जबरदस्तीने ट्रान्सफर करायला लावले. त्यानंतर त्यांना रस्त्यात सोडून आरोपी पसार झाले.

ऑनलाईन व्यवहाराच्या आधारे आरोपींचा शोध सुरू असून, पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पवार करत आहेत.

महाराष्ट्र न्युज नेटवर्क
Maharashtra News Network
RNI NO. MAHMAR/2023/88387 TC No.MAHMAR52531
From : Office No. 301, Tulsi Apts., Near Mahavir Park, Swami Samarth Nagar, Kakde Wasti, Kondhwa BK., Pune - 411 048.



To,

Book Post

# महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावणारे जेरबंद

## तुळशीबागवाले कॉलनीतील घटना : पर्वती पोलिसांची कामगिरी

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : तुळशीबागवाले कॉलनीतून पायी जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून पळून गेलेल्या दोघा चोरट्यांना पर्वती पोलिसांनी जेरबंद केले आहे.**



रोहन प्रभू तुपारे (वय २०, रा. त्रिमूर्तीनगर, नवीन पद्मावतीनगर, अप्पर बिबवेवाडी) आणि केशव ईश्वर कुंभार (वय १८, रा. खोपडेनगर, महांगडेवाडी) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून ५ ग्रॅम वजनाची सोन्याची लगड आणि मोटारसायकल असा १ लाख ११ हजार रुपयांचा माल हस्तगत केला आहे. रोहन तुपारे हा एका कपड्याच्या दुकानात कामाला आहे, तर केशव कुंभार हा महाविद्यालयात शिक्षण घेत आहे.

याबाबत ३५ वर्षीय महिलेने पर्वती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्या १५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी सव्वा सहा वाजता आपल्या मुलीसह किराणा खरेदीसाठी पायी गेल्या होत्या. अंबिका किरण स्टोअरमधून सामान खरेदी करून घरी जात असताना मोटारसायकलवरून आलेले दोघे त्यांच्या जवळ आले. त्यापैकी एकाने त्यांना एका सोसायटीचा पत्ता विचारला. त्यांनी पत्ता माहित नसल्याचे सांगितले. त्याचवेळी पाठीमागे बसलेल्याने त्यांच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र जबरदस्तीने हिसका मारून चोरले आणि गजानन महाराज मठाच्या दिशेने निघून गेले.

या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक किरण पवार करत होते. त्याच वेळी पोलीस अंमलदार प्रकाश मरगजे, राकेश सुर्वे, अमित चिव्हे यांना त्यांच्या बातमीदारांकडून माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे आणि सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण करून पोलिसांनी या दोघांना पकडले. त्यांच्याकडून ५ ग्रॅम वजनाची सोन्याची लगड व मोटारसायकल असा १ लाख ११ हजार रुपयांचा माल जप्त केला आहे.

ही कामगिरी अप्पर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, पोलीस उपायुक्त संभाजी कदम, सहाय्यक पोलीस आयुक्त अजय परमार यांच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड, पोलीस निरीक्षक (गुन्हे) अनिता हिवरकर यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक किरण पवार, पोलीस अंमलदार प्रकाश मरगजे, राकेश सुर्वे, अमित चिव्हे, महेश मंडलिक, सूर्या जाधव, श्रीकांत शिंदे, अमोल दबडे, नानासो खाडे, मनोज बनसोड, सद्दाम शेख यांनी केली आहे.






# घोळक्याने थांबवून कारवाई करणाऱ्या वाहतूक पोलिसांना शिक्षा

## स्वतःचा चौक सोडून टिळक रोडवरील पुरम चौकात गाड्या अडवून करत होते कारवाई

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : टिळक रोडवरील वेगवेगळ्या चौकात कर्तव्यावर नेमणूक असताना ती जागा सोडून पुरम चौकात घोळक्याने थांबवून दुचाकीस्वारांना अडवून त्यांच्यावर कारवाई करणाऱ्या तिघा वाहतूक पोलिसांवरच दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव यांनी हा आदेश दिला आहे.**


संग्रहित चित्र

पोलीस हवालदार संतोष चंद्रकांत यादव, पोलीस अंमलदार बालाजी विठ्ठल पवार आणि मोनिका प्रविण करंजकर/लांघे अशी शिक्षा झालेल्यांची नावे आहेत.

याबाबतची माहिती अशी की, हवालदार संतोष यादव, पोलीस अंमलदार बालाजी पवार आणि मोनिका करंजकर/लांघे यांची खडक वाहतूक विभागात नियुक्ती करण्यात आली होती. १५ मे रोजी संतोष यादव यांना एस. पी. कॉलेज चौक, बालाजी पवार यांना हिराबाग चौक आणि मोनिका करंजकर यांना भावे चौक येथे ड्युटी देण्यात आली होती. मात्र हे तिन्ही ठिकाणे सोडून ते पुरम चौकात एकत्र आढळून आले.

तेथे वाहतूक नियमन न करता, वाहने थांबवून त्यांच्यावर कारवाई करत असल्याचे आढळले. वाहतूक कोंडीच्या वेळी वाहतूक नियमन करणे, वाहतूक कोंडी होऊ न देणे अशा प्रकारच्या सुचना व आदेश देण्यात आले असतानाही त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यांच्या या कसुरीबद्दल त्यांना ५ हजार रुपये दंडाची शिक्षा करण्याबाबत कारणे दाखवा नोटीस दिली होती. त्यावर त्यांनी दिलेला खुलासा अंशतः समाधानकारक आढळला.

त्यामुळे त्यांच्या शिक्षेत बदल करून त्यांना दीड हजार रुपये दंडाची शिक्षा पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव यांनी सुनावली आहे.